# साईलीला

श्रीसाईबाबा संस्थान, शिरडीचे अधिकृत मासिक




श्री साईबाबा हंडीत अन्न शिजवित असतना

फेब्रुवारी १९८३]

[ किंमत एक रुपया

श्री साईनाथ वाचनालय
श्री साईबाबा संस्थान, शिर्डी

जगा लावावे सत्पथी । हेचि साईलीलेची कृती ॥

# श्री साईलीला

श्रीसाईबाबा संस्थान,
शिरडीचे अधिकृत मासिक


: संपादक :

**श्री.क.हि.काकरे**

रिसिव्हर श्रीसाईबाबा संस्थान, शिर्डी

: कार्यकारी संपादक :

**डॉ.श्री.वि.परचुरे**
एम. ए. पी. एच. डी.
( इंग्रजी आवृत्ती )

**श्री.सदानंद चेंदवणकर**
( मराठी आवृत्ती )


## श्रीसाई वाक्सुधा


र्ष ६१ वे)     किंमत १ रुपया     (अंक ११

फेब्रुवारी १९८३

श्रीसाई काव्यबहार विशेषांक

दूरध्वनी
८८२२५६१



: कार्यालय :

" साईनिकेतन ", प्लॉट नं. ८०४-बी, डॉ. आंबेडकर पथ, दादर. मुंबई-४०० ०१४.

दूरध्वनी : ४४३२६१



वार्षिक वर्गणी रु. १०/- (ट.ख.सह) किरकोळ अंक १ रु. फक्त.



## श्रीसाई वाक्सुधा

नमो त्या जन्ममरण निवर्तका ।
करुणाघना ज्ञान प्रकाशका ।
वेदगुह्य सच्चित्प्रतिपादका ।
सर्व व्यापका गुरुवर्या ॥ ९ ॥

नमो संसार तम दिनकरा ।
आत्मानुभव संत शेखरा ।
भक्तचित्त चकोर चंद्रा ।
कल्पतरुवरा गुरुवर्या ॥ १० ॥

अगाध गुरुरायाचें महिमान ।
वर्णितां गळे वाचेचा अभिमान ।
बरें असावें मुकिया समान ।
खालवोनि मान गुरुचरणीं ॥ ११ ॥

पूर्वजन्मीं अनवछिन्न ।
नसतां कोणी तपःसंपन्न ।
होई न तया संतदर्शन ।
त्रिताप निरसनकारक ॥ १२ ॥

परमार्थ मोक्ष वा निजहित ।
साधावें ऐसा जयासी हेत ।
तेणें व्हावें संताचे अंकित ।
उणें न यत्किंचित मग तया ॥ १३ ॥


—श्रीसाई सच्चरित अध्याय ५० वा.

## सुस्वागतम् !

श्रीसाईलीलाच्या
नवव्या
लेखक–कवी
स्नेहसंमेलन प्रसंगी
आम्ही सर्व लेखक–कवी
हितचिंतक या
सर्वांचे हार्दीक
स्वागत करीत
आहोत.

—संपादक

पहिलं नमन परब्रह्माला । गुरुमूर्ती साई देवाला ॥



जगत जननी माय माऊली
साईबाबा माझी आई ॥
अनाथास या होई आई
कुशीत मज तू घेई साई ॥

# श्रीसाईलीला काव्यबहार अंकाचे मानकरी
# फेब्रुवारी १९८३

१) संपादकीय
२) डॉ. रा. सी. कापडी
३) प. पू. श्री. स्वामी संजयानंद
४) प्रा. डॉ. मा. चिं. दिक्षित
५) डॉ. के. भ. गव्हाणकर
६) डॉ. सौ. सुमती खानविलकर
७) डॉ. ग. स. कामत
८) डॉ. वसंत पात्रीकर
९) डॉ. सौ. मालती रहाटे
१०) सौ. चंद्राबेन भाटे
११) डॉ. विनायक दुर्गे
१२) श्री. उज्ज्वल कुलकर्णी
१३) डॉ. कु. इंदूताई नाईक
१४) डॉ. बी. के. डी. मित्तल
१५) प्रा. र. श्री. पुजारी
१६) प्रा. एच. बी. महाले
१७) प्रा. गुंडेराव पटवारी
१८) सौ. लिलाताई मराठे
१९) श्री. जयवंत कुलकर्णी
२०) श्री. ग. शां. वडगुजर
२१) सौ. तारा चेंदवणकर
२२) श्री. जगदीश देवपूरकर
२३) सौ. उषा अधिकारी
२४) श्री. हसमुख ओंकार पाटील
२५) ॲड. श्री. निशिकांत महाडेश्वर
२६) श्री. रमाकांत पंडीत
२७) सौ. प्रेमला मैराळ
२८) सौ. वसुंधरा चोरे
२९) श्री. जगन्नाथ कुलकर्णी
३०) श्री. दा. र. दळवी
३१) श्री. दत्ता कदम
३२) श्री. र. शं. गुन्नरकर
३३) सौ. अस्मिता दांडेकर
३४) श्री. शंकरराव कुलकर्णी
३५) सौ. सरोजिनी मुळ्ये
३६) सौ. अनिता कोरडे
३७) सौ. उषाताई मुळे
३८) श्री. शंकर इनामदार
३९) श्री. प्रभाकर कोळमकर
४०) सौ. शशिकला रेवणकर
४१) श्री. प्रकाश कर्वे
४२) कु. शशिकला साळगावकर
४३) सौ. शांताताई सरोदे
४४) श्री. मधुकरराव अंबाडे
४५) श्री. नृसिंहराजासाहेब देशपांडे
४६) सौ. कलावती चव्हाण
४७) श्री. राधाकृष्ण गुप्ता
४८) श्रीमती श्री शहाणे
४९) श्री. नागेश मोगलाईकर
५०) श्रीमती लीला गुजराथी
५१) सौ. प्रमोदिनी पोतनीस
५२) श्री. डी. बी. जगतपुरीया
५३) श्री. ग. रा. पालकर
५४) श्री. विजय हजारे
५५) श्री. दत्तात्रय मोरे
५६) श्री. रमेश चव्हाण
५७) श्री. अनिल रसाळ
५८) श्री. डी. बी. पोतनीस
५९) श्री. ग. दे. कुलकर्णी
६०) श्री. सूर्यकांत गर्जे
६१) श्री. एन. जी. परुळेकर

स. न. वि. वि.

# श्रीसाईलीलाचे नववे लेखक–कवी संमेलन




श्रीसाईबाबा संस्थान शिरडी या जगप्रसिद्ध संस्थेतर्फे दरमहा श्रीसाईलीला या नावाचे एक प्रसिद्ध मासिक गेली ६१ वर्षे प्रसिद्ध होत आहे. गेल्या दहा वर्षांपासून संस्थानने दोन नवीन उपक्रम सुरू केले आहेत. एक म्हणजे मासिकाची संपूर्ण मराठी आवृत्ती प्रकाशित करणे व दुसरी इंग्रजी-हिंदी आवृत्ती प्रकाशित करणे. या दोन्ही मासिकांतून श्रीसाईबाबांच्यावरील लेख, बाबांच्या भक्तांना आलेले बाबांच्या विषयीचे विविध अनुभव, अन्य संतांच्याबद्दल आदर, संस्थानविषयक विविध सूचना, बातमीपत्रे, संस्थानचे विविध उपक्रम इ. मजकुराचे साहित्य दरमहा प्रसिद्ध होत असते. बाबांचे भक्त या मासिकाचा योग्य तो आदर आजवर राखत आलेले आहेत व यापुढेही ते राखतील यात शंकाच नाही. संस्थानने सुरू केलेला दुसरा उपक्रम म्हणजे साईलीलामधून लेखन करणाऱ्या लेखक–कवींचा मेळावा. दरवर्षी जानेवारीच्या अखेरीस हा मेळावा शिर्डी येथे आम्ही भरवीत आलो आहोत; व या संमेलनरूपी मेळाव्याचे स्वागतही आजवर श्रीसाईलीलाच्या लेखक–कवींनी उपस्थित राहून केलेले आहे. संपूर्ण नियतकालिक जगात आध्यात्मिक साहित्यक्षेत्रात असे हे एक आगळ्याच प्रकारचे संमेलन गेली ९ वर्षे भरविले जात आहे. त्यात खंड पडलेला नाही व पडू पण दिला जाणार नाही. साईलीलासारखे एक छोटेखानी मासिक हे लेखक–कवींचा मेळावा स्वखर्चाने भरवते ही गोष्ट आता जगजाहीर झालेली आहे. जगात निघणारी जी असंख्य मासिके आहेत त्या मासिकांपैकी साईलीला हे एकच एक असे मासिक आहे की ते आपल्या संबंधितांचा तीन दिवसांचा सोहळा भरविते. या सोहळ्याच्या निमित्याने संबंधितांचे स्वागत करताना आज आम्हास आनंद होत आहे.

या संमेलन प्रसंगीच आम्ही साईलीलाचा साईकाव्य बहार अंक प्रकाशित करीत आहोत. हा अंक पण आपल्या हाती देताना आम्हाला हर्ष होत आहे. या अंकात अनेक थोरामोठ्यांनी श्रीबाबांना वाहिलेली भावरूप काव्य सुमनांजली वाचावयास मिळेल आणि आपण कदाचित् भारावून जाल आणि श्रीबाबांच्या चरणी तुमचे मस्तक नक्कीच विनम्र होईल. हा एवढा कार्यभाग जरी साधला तरी आम्ही केलेला हा खटाटोप सत्कारणी लागला असे म्हणता येईल. नेहमीप्रमाणे हे नववे संमेलनही यशस्वीरित्या पार पडो अशी श्रीसाईचरणी प्रार्थना करतो. ●

श्रीसाई लीला ९ व्या लेखक-कवी संमेलनाचे अध्यक्ष-

# कोल्हापूरचे साईभक्त–डॉ. रा. सी. कापडी

–सदानंद चेंदवणकर
कार्यकारी संपादक श्रीसाईलीला
श्री साईबाबा संस्थान शिर्डी

卐  卐

● श्रीसाईबाबा संस्थान शिरडीचे मुखपत्र श्रीसाईलीला (मराठी व हिंदीइंग्रजी) मासिकाच्या लेखक व कवीचे नववे वार्षिक स्नेहसंमेलन सालाबादप्रमाणे यंदाही ३० व ३१ जानेवारी रोजी शिरडीस अतीव उत्साहाने व आनंदाच्या वातावरणात भरविण्यात येत आहे. आमचा आतापर्यंतचा प्रघात असा आहे की, या संमेलनाचे

अध्यक्षपद अशा व्यक्तीला दिले जाते की ज्याने श्रीसाईनाथांना त्यांच्या हयातीत पाहिलेले आहे, त्यांचे दर्शन घेतलेले आहे व त्यांचा सहवास लाभलेला आहे. या प्रथेला अनुसरून या संमेलनाचे अध्यक्षपद यंदा कोल्हापूरचे डॉ. कापडीसाहेब यांना स्वीकारण्यास रितसर विनंती करण्यात आली व ती त्यांनी कुठलेही आढेवेढे न घेता मान्य केली. हे अध्यक्षपद म्हणजे आपल्याला श्रीबाबांनी दिलेला फार मोठा प्रसाद व साईनाथांनी केलेला आपला थोर सन्मान होय असे मत डॉ. साहेबांनी व्यक्त केले आहे, व ते अक्षरशः खरे आहे असे आमचेही स्पष्ट मत आहे.

श्री. राजारामरावांचा जन्म ६ एप्रिल १८९६ रोजी कोकणात रत्नागिरी जिल्ह्यातील संगमेश्वर येथे एका सुसंस्कृत घराण्यात झाला. त्यांचे आईवडील मोठ्या धार्मिक वृत्तीचे होते. लहानपणापासूनच राजारामरावांना संतांची चरित्रे वाचण्याची भारी आवड. त्यांची वृत्तीरग मोठी धार्मिक व सात्विक अशी होती. त्यांचे प्राथमिक मराठी चार इयत्तापर्यंतचे शिक्षण त्यांच्या जन्मगावीच झाले. इंग्रजी शिक्षण संगमेश्वरापासून १० मैल अंतरावर असलेल्या ओझरे या गावी झाले.

संगमेश्वर हे तालुक्याचे ऐतिहासिक गांव. येथेच छत्रपती संभाजी महाराज यांना औरंगजेबाच्या सैन्याने दगाफटका करून पकडले. या तालुक्याच्या ठिकाणी इंग्रजी शिक्षणाची सोय नव्हती. म्हणून ओझरे खेड्यात एका पंगु जागुष्टे नावाच्या शिक्षकांनी इंग्रजी तीन इयत्तेपर्यंत शाळा काढली होती. तेथे हाताने जेवण करून त्यांनी शिक्षण घेतले. पुढील मॅट्रिक पर्यंतचे शिक्षण मुंबईला घेतले. मॅट्रीक परीक्षा धोबीतलावाजवळील एलफिन्स्टन हायस्कूलमधून उत्तीर्ण झाले. उच्च शिक्षण विल्सन कॉलेजातून व एम. बी. बी.एस. परीक्षा ग्रँट मेडिकल कॉलेजमधून उत्तीर्ण झाले. त्यांच्या कॉलेज शिक्षणामध्ये अडथळे आले. इ. स. १९२०–२१ साली स्वातंत्र्य सैनिक म्हणून महात्मा गांधींच्या चळवळीत तीन वर्षे कॉलेज सोडून ते सामील झाले जिल्हा कुलाबा, ता. अलिबाग येथे ते वैश्य विद्याश्रम नावाच्या राष्ट्रीय शाळेत मुख्याध्यापक म्हणून त्यांनी काम केले. पुढे १९२७—२८ मध्ये संग्रहणीमुळे आजारी झाल्याने २ वर्षे कॉलेज सोडून गांवी त्यांना रहावे लागले. इ. स. १९३०–३१ मध्ये मेडिकलचे शिक्षण त्यांनी पुरे केले. पुढे मुंबई मद्रास येथे कॉलेजमध्ये पदव्युत्तर शिक्षण त्यांनी घेतले. नंतर मुंबई सोडून जन्मगावीच मेडिकल प्रॅक्टीस सुरू केली. मुंबईला त्यावेळी प्रॅक्टीसला चांगला जम असताना काही वर्षे ज्या जन्मभूमीत ते जन्मले, खेळले, वागले त्या ठिकाणच्या लोकांची सेवा घडावी अशा उच्च ध्येयाने प्रेरित होऊन खेड्यात ते आले. सह्याद्रीच्या कोनाकोपऱ्यातून कधी पायी, कधी डोलीतून रात्री अपरात्री जाऊन त्यांनी रुग्णांची सेवा केली. कधी खाडीतून जयगड बंदरा-

पर्यंत तर कधी होडीतूनही प्रवास त्यांनी पायी केला. बाळंतपणे सोडवण्यापासून कॉलऱ्यासारख्या रोग्यांच्याही ते उपयोगी पडले.

संगमेश्वर गावातील सामाजिक व शैक्षणिक कार्येही त्यांनी यशस्वीपणे हाताळली. तेथे बॅरिस्टर सावरकर यांच्या हस्ते उघडलेली इंग्रजी शाळा, तेथील पैसा फंड नावाच्या संस्थेचे अध्यक्ष म्हणून काम करून फुलफ्लेज्ड हायस्कूलपर्यंत नावारूपास आणण्यास त्यांनीच मदत केली. अशा रीतीने इंग्रजी शिक्षणासाठी त्यांना जसे हाताने जेवण करून शिक्षण घ्यावे लागले तसे नवीन पिढीला पडू नये अशी शक्य तो तेथील लोकांच्या मदतीने सोय करण्याचे अल्पसे प्रयत्न साईबाबांच्या कृपेने त्यांनी केले. जातीजातींच्या ज्या अनेक उपजाती होत्या त्या मोडण्यासाठी सार्दळ गुरुजींच्या व तेथील स्थानिक पुढाऱ्यांच्या सहाय्याने कोंकणातील प्रचंड 'महाराष्ट्र वैश्य परिषद' भरविण्यास त्यांनी मदत केली. रोटीबेटीचे व्यवहार होत नव्हते ते सर्रास होऊ लागले.

पुढे आपल्या मुलांच्या कॉलेज शिक्षणामध्ये अडचणी येऊ नयेत म्हणून १९४१–४२ मध्ये ते कोल्हापूरला जे स्थायीक झाले ते आजतागायत.

मॅट्रीक व कॉलेजचे शिक्षण चालू असता एक मोठी घरगुती अडचणीची घोंड आडवी आली. त्यांचे वडील बंधु सखाराम ज्यांनी वडिलांचा व्यापारी पेशा मोठ्या जिद्दीने भरभराटीस आणला. ते अकस्मात १९१८ च्या फ्लूचे साथीत परलोकवासी झाले. त्यांनी मरणाच्या काहीं दिवसांपूर्वी साईबाबांचे दर्शन घेतले होते. त्यांच्याच साईबाबांच्या भक्तीमुळे ते श्रीबाबांकडे आकर्षित झाले. वडिलांची इच्छा त्यांनी व्यापारांत पडावे व त्यांची इच्छा डॉक्टर व्हावे ही होती त्यामुळे मन दोलायमान झाले.

यातून मुक्तता त्यांचे परात्पर सद्गुरु साईबाबा यांनी केली. इ. स. १९१८ चे मे महिन्यात त्यांचे दर्शन त्यांनी प्रथम घेतले. त्यावेळी ठामपणे श्रीसाईबाबांनीच त्यांच्या शिक्षणाचा मार्ग मोकळा केला. तू उत्तम डॉक्टर होशील असा शुभाशीर्वाद बाबांनीच त्यांना दिला व तो सफल झाला. त्यांच्या कृपेनेच ते सर्वार्थी मोठे झाले. साईबाबांच्या निर्वाणानंतर ते आपले धाकट्या बंधुबरोबर–चि. केशव–शिर्डीला गेले होते. त्यावेळी बाबांच्या समाधीचे दर्शन पायऱ्या उतरून घ्यावे लागे.

डॉ. कापडी यांच्या घराण्यात दिर्घायुष्याची परंपरा आहे. वडील ८० वर्षांचे होऊन गेले. आजी–वडिलांची आई ९० वर्षांच्या होऊन स्वर्गवासी झाल्या. ते ८७

वर्षांचे, मघला भाऊ ८५ वर्षांचा, बहीण ८३ वर्षांची व शेवटचा भाऊ ८०–८१ वर्षांचा आहे. त्यांचे भाऊ व बहीण चांगले आज हिंडते फिरते आहेत.

डॉ. कापडींची वृत्ती जिद्दीची आहे. अडथळे आले तरी त्यांनी शिक्षण पुरे करणाची धडपड केली. त्यांचा पिंड समाज सेवेचा, परोपकारी वृत्तीचा. धार्मिक व सात्विक स्वभावाचा आहे. लहानपणापासून मनाचे श्लोक, गुरुचरित्र, दासबोध विष्णु सहस्त्रनाम, शिवलिलामृत वगैरे ग्रंथाचे पारायणे करण्याची सवय, महाभारत व रामायण हे ग्रंथ प्राकृतमध्ये अथपासून इतिपर्यंत त्यांनी वाचले आहेत. संतांची दर्शन घेण्याची ओढ त्यांना मनस्वी आहे. पाटगावचे श्री बाळकृष्ण उर्फ दादामहाराज, केडगावचे नारायण महाराज, हुबळीचे सिद्धारूढ महाराज, मेहेर बाबा, साईबाबा, उपासनी बाबा, व्यंकनमट्टीचे हरी काका, पुण्याचे गुळवणी महाराज, चित्रकूट मठाचे माधवनाथ महाराज, त्यांच्याच गादीवर असलेले व्यंकटनाथ महाराज, नाना महाराज, श्याम महाराज, चिले महाराज विजापूरचे गहनी स्वरूपी आप्पा महाराज, गगन गडावरील बाबा गगनी कोल्हापूरचे दत्तावतार बाळ मुकुंद महाराज पावसचे स्वरूपानंद वगैरे श्रीधर स्वामी महाराज संताचे दर्शन त्यांना घडले आहे. हेतू हाच संतांच्या दर्शनाने पुण्याची एक एक गाठ म्हणजे पुढील जन्मीच्या सोपान मार्गाची एक एक पायरी चढण्यास सोपे जाते असा त्यांचा समज आहे.

कोल्हापूरला येऊन स्थायिक झाल्यावर डॉ. कापडींनी रोग्यांची सेवा तर केलीच पण त्याचबरोबर सामाजिक कार्यातही लक्ष घातले. कोल्हापूरच्या राजारामपुरीतील पाण्याचा प्रश्न सोडविणे, ग्राहक सोसायट्यांची स्थापना करणे, हौसिंग सोसायट्या स्थापण्यास चालना देणे यासाठी ते सतत प्रयत्नशील राहिले. कोल्हापूर जिल्हा को. हौसिंग सोसायटी फेडरेशनचे ते १३ वर्षे अध्यक्ष होते. तेथल्या बेनाडीकर विद्यालयाचे हायस्कूलमधे रुपांतर करण्यास तेच कारणीभूत आहेत.

डॉ. कापडींना लेखनाचा छंद अजूनही आहे. अनेक संतांची चरित्रे त्यांनी लिहिली, लघुलेख लिहिले. विशेष सांगण्यासारखी गोष्ट म्हणजे त्यांनी सहा–सात मराठी नाटके लिहून ती रंगभूमीवर पण आणली आहेत. इतकेच नव्हे तर वयाच्या ८७व्या वर्षी एका गणेशोत्सवात 'भावबंधन' नाटकातून धुंडीराजाची भूमिका पण शंभर टक्के यशस्वी वठविली आहे. संतांची आणि रंगशारदेची अशी डॉ. कापडींनी फार मोठी सेवा बजाविली आहे. याबद्दल कुणासही त्यांचे मुक्तकंठाने कौतुकच करावे लागेल. अशा या श्रीबाबांच्या कृपाशिर्वादामुळे दिर्घायुष्य गाठलेल्या सेवाभावी वृत्तीच्या, साहित्यिक प्रवृत्तीच्या डॉ. राजारामराव कापडींच्या हातून श्रीसाईलीलाचे लेखक–कवींचे ९ वे संमेलन यशस्वीपणे पार पडो अशी श्रीसाईचरणी प्रार्थना करतो. ●

# शिरडीवाला साई

[ चाल—आजारे आजारे आजा मेरे दिलवर आजा। फिल्म—नूरी ]

आलारे, आलारे, आला साई आला
शिर्डीवाला साई आला
आलारे, साई....साई ॥ धृ० ॥

मुस्लिमांना तो राम राम करी, अल्ला मालिक हिंदूना।
मानवतेचा बोध हा दिधला, विश्वात साऱ्या धर्मांना।
गेला रे शिरडीत येऊनी वाया गेला, दाखवा कोणी ऐसा मजला ॥ १ ॥
आला रे आला साई आला....

फकिरी रहाणे, गरिबी खाणे, साईचा ढंग निराळा।
सांगोनी गेला नवसाख पावेल समाधी ही सर्वांना।
दारोदारी प्रेम भिक्षा घेण्या फिरला, औघड दानी मौला ॥ २ ॥
आलारे आला साई आला...

मशिदीमध्ये पूजा करितो शिवलिंगाची साई।
मंदिरातूनी मंत्र सांगे 'अल्ला भला करेगा' भाई।
अंत ह्या साईचा नाही मिळाला संजय नमितो साईला ॥ ३ ॥
आला रे आला रे साई....

**—स्वामी संजयानंद,**
बद्रिनाथ धाम हिमालय

---

पान नं. २ वरील छायाचित्र बांद्र्याचे कलामहर्षि श्री. जाधव मास्तर यांनी आमच्या निवासस्थानी नुकत्याच उभारलेल्या द्वारकामाईतील श्रीबाबांचे आहे.

## साईलीला स्तवन

अगम्य तव लीला, साई, अगम्य तव लीला ॥ धृ ॥
निवास करण्या खेडे शिरडी
पंढरीच भक्तांसी अवघी
राही शिवशंकर गंगौघी
समुद्रातल्या द्वारिकेत श्रीकृष्ण असे अवतरला ॥ १ ॥

बसली स्वारी पाय मुडपुनी
चरण दुजा भूवरी ठेवुनी
पाषाणा सिंहासन करुनी
निंबतरुतळी ध्यान देखिते परमेश्वर ध्यानाला ॥ २ ॥

पटकुर अंगावरी फाटके
वसन तनूवर दिसे नेटके
शिरस्त्राण कपड्याचे फडके
परब्रह्म चैतन्य लेविते ज्ञान प्रकाशाला ॥ ३ ॥
गुरुपद दिसती हे अनवाणी
गंगा यमुना संगम चरणी
पापक्षालनासाठी करणी
सद्‌गुरुचे हे चरण पुरातन तीर्थक्षेत्र स्नानाला ॥ ४ ॥

भिक्षापात्रा ठेवी जवळी
'भिक्षांदेही' वेळी अवेळी
या मायेची रीत आगळी
फकीर हाजीमलंग वेषी अमीर याचक झाला ॥ ५ ॥

घेई दक्षिणा ऋण फेडाया
घेई कसोटी कृपा कराया
वरुनि क्रोध परि अंतरि माया
अशी रीत विपरीत भासते अज्ञानी भक्ताला ॥ ६ ॥
अमीर असुनी फकीर होणे
कल्पवृक्ष करि अल्प मागणे

देणे सोपे अवघड घेणे
आचरणाने सिद्ध कराया दत्त द्वारि पातला ॥ ७ ॥

ऐसा हा नाटकी नटेश्वर
उठवि वादळे जी प्रलयंकर
'साक्षी केवळ मी' नच ईश्वर
ऐसे म्हणुनी जीवन नौका नेई पैलतीराला ॥ ८ ॥

सबुरी श्रद्धा सदा बाळगा
'अल्ला तेरा भला करेगा'
आशिष देई भक्तां सुभगां
'पाहिन तुम्हांकडे पाहता माझ्याप्रत' वचनाला ॥ ९ ॥

ऐसे साई विचित्र दैवत
भक्तांमागे येई धावत
देव करी भक्तांसी अंकित
ऋणानुबंधे ओढुनि घेई ज्याला म्हटला आपुला ॥ १० ॥

—प्रा. डॉ. मा. चिं. दीक्षित
एम्. ए. एम्. कॉम. पी. एच. डी.
१२०६/२२ अ शिरोळे रोड,
शिवाजीनगर, पुणे ४११००४

## श्रीमती गाळवणकरांचे देहावसान

'शिरडी के साईबाबा' या चित्रपटाचे एकमेव वितरक व विलेपारले येथील एक साईभक्त श्री. शरदराव गाळवणकर यांच्या मातोश्री श्रीमती सुशिलाबाई लक्ष्मण गाळवणकर यांचे कर्करोगाच्या विकाराने वयाच्या ६९ व्या वर्षी देहावसान झाले. त्या श्रीसाईभक्त होत्या व नेहमी परमेश्वर सेवेतच लीन असत.

श्रीसाई मृताच्या आत्म्यास चिरशांती व सद्‌गती देवो.

# अभंग साईचे

१

जीवाच्या जिवलगा । लोटू नको रे दूर ॥
प्रेमाचा पूर आला । भरून गेला ऊर ॥
बाष्पगद्गद झाले मन । काया अवघी पांगुळली ॥
कंप देहाला सुटला । लोचने ही पाणावली ॥
श्रद्धायुक्त सबुरीने । जाते परमार्थाची वाट ॥
सांगे केशव प्रेमाने । चढा भक्तीचा हा घाट ॥

२

जाईन मी शिरडीला । माझे पंढरपुरा ॥
भेटेन श्री साईला । माझे रखुमाईचे वरा ॥
खेळ मी खेळेन । शिरडीचेचि घरा ॥
करीन गुणगान । तया रखुमाईचे वरा ॥
सुग्रास रे खाईन । घेईन रे निवारा ।
मजला काय उणं । माझिये मायेरा ॥

३

होईन मी साईचा । शामसुंदर घोडा ॥
पालखीसमोर गुरुवारी । नाचेन मी थोडा ॥
लेंडीबागेत शिरडीच्या । फुलझाड मी होईन ॥
साईसमाधीचे वरी । मांड फुलांचा घालीन ॥
माध्यन्हीच्या समयी । होईन फुलवाती ॥
पंचप्राणाच्या दीपाने । करीन मी आरती ॥
दगड होऊन राहीन । श्री द्वारकामाईत ॥
माझा तोचि भाऊराया । बसेल समाधीत ॥
माहेरा माझिया होईन । झाडू मी केशव ॥
झाडीन भूमि सकल । साई माझा देव ॥

—डॉ. के. भ. गव्हाणकर
इंदिरा निवास, लालबहादूर शास्त्री मार्ग
कुर्ला (पश्चिम) मुंबई ७०

# निरोप

निरोप मागे लेक लाडकी
बाबा निरोप द्या मजला
परतोनी कधी भेटाल सांगा मजला
जाते परतोनी नश्वर संसारी
कृपे करीन कर्तव्य पुरी
फिर फिरूनी मागे पहाते
गादीवरूनी ताता
गंगा यमुनांचा पुर लोटला नाथा
दुःख संकटे कशाचे न भय मना
तुज भेटावे हीच मनोकामना
आवरू कशी ही तुजवरील माया
वाहिली सुमनने तव चरणीं काया

—डॉ. सौ. सुमती खानविलकर
सीताकुंज, बाँबे-पुना रोड, लोनावळा

# प्रार्थना !

। इहलोकीं मज नावडे सर्व काहीं ।
। साई नामा शिवा मज दुसरे काही नाही ।
। दुःख आणि सुख या चित्ता प्रपंचापासूनी ।
। मुक्त करी साई ह्या आसक्तिपासूनी ।
। ये घरीं दिधला जन्म मज जेणी ।
। त्याचे करीन चिंतन रात्र दिनी ।
। बुद्धी राहो स्थिर सदा तुझ्या चरणीं ।
। समाधान पावेल माझ्या मनीं ।
। मज भक्ति भावें प्रेम देई तू साई ।
। आणिक मागणें या परते नाहीं ।

—डॉ. ग. स. कामत,
११९४/१२, प्रसाद बंगला,
शिवाजीनगर, पुणे ४११००५

# सांई सांई रटकर

२ (तर्ज--पिया पिया रटकर मैं)

सांई सांई रटकर मैं तो,
तर जाऊँ रे सारी सगरिया ॥ टेक ॥

ढुंढ रहा था मैं उसको बन में,
भटकत--भटकत बहु भटकैया।
फिर भी मिले ना जब वह मुझको,
थाम लिया तब हार के पैया ॥ १ ॥
तर जाऊँ......

साई गुरू तब कहन लागे,
काहे को मूरख तू भरमैया।
बाहर का रे कछु नहीं लागे,
मन भीतर है भरी गगरिया ॥ २ ॥
तर जाऊँ......

पयोधर काम सरन को भाई,
गुरू को साध मन की डगरिया।
भव चिंता से तर जाये प्राणी,
सारथ होवे रे तेरी उमरिया ॥ ३ ॥
तर जाऊँ......

—डॉ. वसन्त दिवाकर पात्रीकर 'पयोधर'
रोडी मार्ग, गल्ली नं. २ टिळकनगर,
बिलासपूर (मध्यप्रदेश)

## देई मज निरोप साईदेवा

समाधीमंदिरात शांतता प्रसन्नता
साईमय सारे दिसती नाही कुठे कुरूपता ॥ १ ॥
तुझ्या नजरेत दिसली करुणा
मनोमनी हसतसे माझा साईराणा ॥ २ ॥
प्रकाशाची ज्योत हातात तुमच्या
प्रकाशीत करीते मन माझे ॥ ३ ॥
तुमच्या चरणात पाहीली मी गंगा
मन शुद्ध झाले पांडुरंगा ॥ ४ ॥
स्वरुप तुमचे शांतीचाच ठेवा
अन्यायाची चाल नको साईदेवा ॥ ५ ॥
तुझ्या दर्शनाने मन शांत झाले
चित्त स्थिरावले साईनाथा ॥ ५ ॥
घरदार तुम्ही दिले, जाणे मला भाग
देई मज निरोप साईदेवा ॥ ७ ॥

—डॉ. सौ. मालती राहाटे
मेडीकल ऑफीसर जिल्हा रुग्णालय
जुनी बिल्डींग, मु. पो. जि. भंडारा

## शिरडीपती ओ साईराम

शिर्डीपति ओ साईराम पतित पावन साईनाम
साईराम साईराम भज मन प्यारे साईराम
भीड पडी भक्तोंने पुकारा कष्ट हरा साई तुने हमारा
शिरडी में तू प्रगटे राम पतित पावन साईनाम
मानवताका मंत्र सिखाया उचनीच का भेद मिटाया
सब भक्तोंके पुरणकाम पतित पावन साईनाम
द्वारकामाई में धुनी लगाई पानी में से ज्योत जलाई
मन के दीप जलानेवाले पतित पावन साईनाम
दीन दयालू साईराम सबको सन्मति दे भगवान
चंदु के रखवाले राम पतित पावन साईनाम

—सौ. चंद्राबेन भाटे
जयंत विल्ला, किडवाई मार्ग, वडाळा, मुंबई

## साई चरणीं नमवी निज मन

साई चरणी नमवी निज मन ॥ धृ० ॥
वाजे कोठे मृदंग वीणा ऐकू येई अभंग वाणी
भक्ति रसाने अपूर्व नटली अती चंचला वृत्ती राणी
समर्पणाच्या राजपथावर जन सेवेचे कंकण बांधून
साई चरणी नमवी निज मन ॥ १ ॥
वृत्ती शमली पुरी तरीही अन्तर्ज्वाला हृदी पेटती
तया विझविण्या समर्थ शक्ती आज कुठेही दिसे न जगती
तयास यत्ने शांत कराया सेवा धर्मे साधक जीवन
साई चरणी नमवी निज मन ॥ २ ॥
मिळो साधका नवी प्रेरणा, क्षुब्ध मानसी नवी चेतना
मोक्ष प्राप्तीच्या सुप्त भावना करो अखंडित मूक साधना
सत्यं, शिवं अन् सुंदरतेचा जगी भराया सुगंध पावन
साई चरणी नमवी निज मन ॥ ३ ॥

—डॉ. विनायक गो. दुर्गे, 'दुर्गेश'
'सौजन्य' धर्मपेठ, विस्तार
नागपूर १०

## असा साई असता पाठी

卐 卐 卐

जे असती अनाथ
त्यांचा आधार साईनाथ
जे असती अपंग
साई त्यांच्या सदासंग
जे असती चिंताग्रस्त
साई त्यासाठी व्यस्त
दुःखाने जे गांजले
साईनाथे त्यांना उद्धरिले
असा साई असता पाठी
का न व्हावी भक्तांची दाटी !

—श्री. उज्ज्वल वामनराव कुळकर्णी

# दर्शन

हृदयाचा मांडीला पाट । सुविचारांच्या लाविल्या माळा।
तुझा मम मना लागला लळा छान छान ।
कधी देशील दर्शन साईनाथा सांग सांग ॥ १॥

कधी म्हणशील तुझी मला । कधी देशील दर्शन छान छान
साईनाथा सांग सांग ॥ २॥

झुणका भाकर कांदा । शिरा केला ताजा।
जेऊ घालीते छान छान । कधी देशील दर्शन
साईनाथा सांग सांग ॥ ३॥

मानव्रता जाणीते नम्रता स्वीकारीली । पूजा करिते छान छान
कधी देशील दर्शन साईनाथा सांग सांग ॥ ४॥

गर्व अहंकाराचे करून मुटकुळे । दृष्ट काढीते छान छान
कधी देशील दर्शन साईनाथा सांग सांग ॥ ५॥

तन मन धन वाहिले मज दूर लोटू नको आता।
साईनाथा तुला माझी आण।
कधी देशील दर्शन साईनाथा सांग सांग ॥ ६॥

इंदू पूजिते सुमनाने इंदू विनविते सुमनाने
स्विकारूनी हे होई तू छान छान।
कधी देशील दर्शन साईनाथा सांग सांग ॥ ७॥

—डॉ. कु. इंदुताई नाईक
सीताकुंज, मुक्ता नर्सिंग होम,
लोनावळा

# तू श्याम मेरा

साईं नाम तेरा—तू श्याम मेरा—(२)
तू ही बना दे,
तू ही मिटा दे
यह सब खेल तेरा—तू श्याम मेरा...
साईं नाम तेरा—तू श्याम मेरा—(२)

फिर से आजा
दर्श दिखा जा
दुनिया है घर तेरा—तू श्याम मेरा...
साईं नाम तेरा—तू श्याम मेरा—(२)

झगडे मिटा दे,
सब एक कर दे
सब में खून तेरा—तू श्याम मेरा...
साईं नाम तेरा—तू श्याम मेरा—(२)

रोटी कपडा देना
श्रध्दा सबुरी देना
है काम तेरा—तू श्याम मेरा...
साईं नाम तेरा—तू श्याम मेरा—(२)

—डॉ. बी. के. डी. मित्तल
मॅनेजिंग ट्रस्टी,
श्री साईबाबा सेवा संस्थान,
६, सिविल लाइन्स, मेरठ (उ. प्र.)

## श्रीसाई बसले स्नाना, प्रातःस्नाना

संपली तमाची निशा, उजळल्या दिशा
उमलल्या आशा, विहंगम गगना
श्रीसाई बसले स्नाना, प्रातःस्नाना ॥ १ ॥
हे शिल्प अशी भावना, शिवो ना मना
नको कल्पना, प्रभू या स्थाना
श्रीसाई बसले स्नाना, प्रातःस्नाना ॥ २ ॥
ही गौर मुलायम तनू, गुलाबच म्हणू
रंगली जणू, भारली स्तवना
श्रीसाई बसले स्नाना, प्रातःस्नाना ॥ ३ ॥
हे उष्ण सुवासी जळ, शुभ्र निर्मळ
बाळगोपाळ, घालिती स्नाना
श्रीसाई बसले स्नाना, प्रातःस्नाना ॥ ४ ॥
गुरुचरणी तीर्थे किती, भरे त्या मिती
नित्य झिरपती, लागती चरणा
श्रीसाई बसले स्नाना, प्रातःस्नाना ॥ ५ ॥
हे कलश कसे वर्षती, दुग्धसे स्तुती
गीत आळविती, 'प्रभो! कर करुणा'
श्रीसाई बसले स्नाना, प्रातःस्नाना ॥ ६ ॥
हे दुर्लभ श्रीपद-जळ, भाग्य त्या मोळ
तीर्थ निर्मळ, कुरोगा-हरणा
श्रीसाई बसले स्नाना, प्रातःस्नाना ॥ ७ ॥
मृदु करे गंध लेपन, वस्त्र परिधान
पुष्प-अर्चन आरती-[illegible]
श्रीसाई बसले स्नाना, प्रातःस्नाना ॥ ८ ॥
हे दर्शन मंगलमय, जिवा सुख होय
समोरी माय, अंतरी ध्याना
श्रीसाई बसले स्नाना, प्रातःस्नाना ॥ ९ ॥

—प्रा. र. श्री. पुजारी
रमानिवास, ९९२ सदाशिव
पुणे—३०

# तीर्थ क्षेत्र शिरडी

शिरडी क्षेत्र महान ।
साई विठ्ठल मूर्ति छान ।
अखण्ड करावे गुणगान ।
अंतरीची खूण तू जाण ।
शिरडी क्षेत्र महान ॥ १ ॥
दर्शन होता द्वारका माई ।
रात्रंदिन पापे जाळी ।
लेण्डीबाग बाबांनी लाविला ।
श्रध्दा सबूरीचा धडा शिकविला।
शिरडी क्षेत्र महान ॥ २ ॥
साई समाधी मंदिरात
अनेक धर्मी हजेरी लावत ।
तूच राम नि तूच रहीम ।
पटविले बाबांनी ठाम ।
शिरडी क्षेत्र महान ॥ ३ ॥
कितेकांनी नवस केले ।
बाबांनी ते पुरविले ।
जिवंत मी खूण पटविली ।
प्रेम भक्तिची ज्योत उजळली ।
शिरडी क्षेत्र महान ॥ ४ ॥
निंबाखाली गुरुस्थान ।
दर्शन करिता पुण्य महान ।
वाहिले ज्यांनी काया-वाचा मनी।
बाबांनी फेडिले त्याचे ऋण ।
शिरडी क्षेत्र महान ॥ ५ ॥

—**प्रो. एच. बी. महाले**, एम. एस. सी.
अध्यक्ष, गणित विभाग
ज. ह. शासकीय स्नातकोत्तर महाविद्यालय, बैतूल

# साई विर्दित मन्ये !

हे सद्गुरु साईनाथा,
मी खचित तुझे अल्प रूप जाणतो,
मी अल्प आहे,
माया मोहाने,
अधि दैवतोपाधी परिच्छिन्न रूप,
उपाधि शून्य, शान्त, अनन्त,
हे सर्व अल्पच आहे,
इच्छा करून, नवस सांगून,
नाश वस्तूच्या प्राप्ती करिता,
स्वानुभव न घेता,
तुला न समजता,
जे जाणतो,
ते अल्पच ना !
ज्ञान निष्ठा, कर्म निष्ठा नसल्यामुळे,
मी अल्पच म्हणून, अल्पच जाणतो,
'नाहं मन्ये सु वेदेति न वेदेति वेदंच !
यो नस्तग्देद नो न वेदेति वेदेंच !'

—प्रा. गुंडेराव पटवारी
'साहित्य रत्न'
एन्. एफ. जे. कॉलेज,
बिदर ५८५४०१

## साईंले घोडागाडी

(अहिराणी गीत)

**हाई** घोडा गाडी, कोठे हो **चालनी**
**सोनानी** दुशेर, झालर मोतीनी ॥
**याले** जरीना गोंडा, रेसमनी झुल
**उमदाज** घोडा, चालानाच डौल ॥
चमके आरशा, गाडीना छतले
वाजतीस **घाट्या, आड्याज** दांडाले ॥
मखमली पडदा, उडे फडफड
गाडीन ते चाक, वाजे खडखड ॥
रंगीत गाडीरे, चांदीना घुंगरू
चाकनी **आरीले,** रंग लाल गेरु ॥
हाई घोडा गाडी, **कोन्हीज बनायी**
अबलख वारू, नाचे थुईथुई ॥
जाधव मास्तर, **ऱ्हाये ममईले**
**दिधी** घोडा गाडी, साईले बठाले ॥
साईले आसन, **सजाड** सोनानं
**मानीकन** मखर, नही काई उनं ॥
लीला म्हने साई, येन शिरडीले
**आसा** बंधु भेटे, **माले** सोबतले ॥

---

**टिप** — हाई=ही. चालनी=चालली. सोनानी=सोन्याची. याले=याला उमदाज=उमदा. घाट्या=घंट्या. आड्याज=आडव्या. आरीले=अरीला. कोन्हीज बनाया=कुणी बनविली. ऱ्हाये ममईले=रहातो मुंबईला. दिधी=दिली. सजाड=सजविले. मानीकन=माणकाच. काईउनं=काहि उणं. आसा=असा. माले=मला.

—सौ. लीला डी. मराठे
साक्री रोड, धुळे

# साई बडे दयालू हैं

साई बडे दयालू हैं, दयालू हैं बाबा बडे दयालू हैं,
नहीं लगती करने तपस्या
बस एक पुकार में आते हैं
आते हैं साई बडे दयालू हैं
● कितनोंके संकट हारे, कितनोंकी बिगडी बनाई
भक्तोंका पालन करने और भक्ती भाव फैलाने
ये कलजुग में पधारे हैं पधारे हैं साई बडे दयालू हैं
● यहाँ मेले लगे रहेंगे मैं समाधिसे देखुंगा
मेरी हड्डी बातें करेगी मैं मन्नतको यश दूंगा
ये बचन दिया है साईने साई बडे दयालू हैं
दयालू हैं बाबा बडे दयालू हैं नहीं लगती तपस्या
बस एक पुकार में आते हैं आते हैं साई बडे दयालू हैं
दयालू है बाबा बडे दयालू है

—श्री. जयवंत कुलकर्णी
कुलकर्णी कुटीर, १०, प्रार्थना समाज रोड
विलेपार्ले (पूर्व), मुंबई ४०० ०५७

# साईगीत

卐 卐

मनात ध्यावे साई
साई नयनी पहावे
भजनी गावे साई
साई मुर्ती पूजावे
नाम स्मरावे साई
साई जीवन व्हावे
किर्तीरूपी उरावे साई
साई गीत नित्य गावे

—श्री. ग. शां. बडगुजर
मोगलाई, माटेचाळ, धुळे १

## वंदू या प्रेमे श्रीसाईनाथा

वंदू या प्रेमे श्री पूज्य साईनाथा
नम्रपणे आळवी तुम्हा आद्य गुरुनाथा ।
तुम्हा चरणी मन लागो सुविचार सदा जागो
सत्कार्यी तनू लागो प्रार्थिते तुम्हा ॥ वंदू या ॥
ब्रह्मा विष्णू महेश तुम्ही
आदि माया शक्ति तुम्ही
अलख निरंजन दत्त तुम्ही
गुरु साईनाथा ॥ वंदू या ॥
मज नम्र ठेवा तुम्ही जगी
द्यावा ठाव तुम्हा पायी
मुखी नाम सदा साई
हिच भिक्षा वाढी मज गुरु साईदेवा
वंदू या प्रेमे श्री पूज्य साईनाथा ॥

—सौ. तारा पेंडणकर,
राधामाधव, १२८/४८५९ टिळकनगर,
मु. पो. चेंबुर, मुंबई ८९

---

## साई रूबाई

ना दुनियाची ना जगण्याची केली आम्ही पर्वा
आम्ही लेंडी बागी झालो, पवित्र 'श्री' च्या दुर्वा
एकेकाची जखम पुरानी, आहे तीला एक कहानी
मीटली आग कशी विराणी ! नव्हते तेथे काही पाणी
गोडीचेही फळ कधीतरी देते, चवीचा दगा
कडुलींबाच्या ह्या मधुरपणावर इत्तच सारे बघा
निधर्मीयांचा आमचा देश, साक्ष देते 'नगरी साई'
गावगावच्या हरेकाला दर्शनाची होते घाई
'श्रद्धा आणि सबुरी' हीच आमची खरी शिदोरी
जीवनाचा हा महामंत्र सदैव नांदो घरोघरी

—श्री. जगदीश देवपुरकर
'सुमनेंदु सुत' ग. नं. ६/२२६८ धुळे १

## प्रभुसाई

तू निर्गुण रूप निराकार, परि साईरूपे साकार
होऊनी भक्ता तोषविले ।
नाही केलेस कीर्तन, नाही दिधले प्रवचन
तरीही भक्तांना उद्धरिले ।
स्वमहात्म्य नाही वाढविले, सर्व श्रेय ईश्वरा दिधले
ऐसा संत जगी तूच एकमेव ।
कोणा शब्दाने दुखविणे, तेणे येते मजला दुखणे
उपदेशाने या आचरण सुधारले ।
सर्व धर्मीय जवळ केले, आपपर भाव मिटविले
बंधुत्वाचे बीज रोवियले ।
कोणी येवो आपद्ग्रस्त, अथवा व्याधी होऊनी त्रस्त
ठेऊनी अभयहस्त मुक्त केले ।
ऐसा माझा साई, तोच माझी प्रिय आई
चरणी लोळूनी कृतार्थ मी होई ॥

—सौ. उषा प्र. अधिकारी
सावित्री भुवन, बंदर रोड, रत्नागिरी

## साई माऊली सुखाची साऊली

साई तू माऊली, तुच माझा पिता
माया ठेविशी रे, जशी माय ताता –धृ–
ज्यास कोणी नाही, त्यास एक तूही
उपकार तुझे, सांगू किती किती
पोरका कसा मी, तूच माझा त्राता –१– माया...
तुझ्या समाधीची, चढता पायरी
हरे दुःख सारे, मिळे सुख शांति
सर्व नष्ट होती, मनातील चिंता –२– माया...
संकटात तू येशी, तारण्या भक्ताला
शरण जे येती, तुझे नाम घेता
स्मरा साई साई, होई पार पार बेडा –३– माया...

—श्री. हसमुख ओंकार पाटील
गुजरगल्ली, मु. पो. ता. नवापूर, जि. धुळे

# श्री साईबाबा स्तवन

जय श्री साईनाथ
शिर्डी साईबाबा
तुमच्या कृपेने पावन झाले
लाखो पतीत दलीत
जीवनाच्या आनंदाचा
अलौकिक संदेश तुम्ही दिघला
पाणी ओतून पणत्यात
तुम्ही दिवे जाळलेत
अद्वैताचा महान संदेश
आपल्या भक्तांना दिघला
हिंदु-मुस्लीम ऐक्याचा
अमर संदेश
आपल्या वाणीतून आपण
आपल्या भक्तांना दिला
पतीतांचे जीवन आपण
आपल्या अमर वाणीने
पुनीत केले
शिरडी पवित्रस्थान
तीर्थस्थान बनले
आपल्या कृपेने
आपण एक महापुरुष
एक दिव्यपुरुष
अनेकाना अध्यात्माचा
दिव्य संदेश देवून
आपण पुनीत केले
अनेकांचे जीवन कृतार्थ केले
आपल्या दैवी चमत्कारांनी
अनेकांचे जीवन पावन केले
जय श्री साईनाथ
जय श्री साईबाबा

आपल्या जीवन ज्योतीने
अनेकांच्या जीवन ज्योती
आपण पेटविल्यात
अनेक दुर्दैवी लोकांचे जीवन
आपण पावन पुनीत केले
जय श्री साईनाथा जय श्री साईबाबा
शिर्डीतील आपल्या
पुनीत वास्तव्याने
ती भूमी पावन झाली
अजूनही आपण
आपला दिव्य साक्षात्कार
आपल्या भक्तांना देत आहांत
जय श्री साईनाथ
जय श्री साईबाबा

—ॲडव्होकेट **निशिकांत सखाराम महाडेश्वर**
बी. ए. (ऑनर्स) एलएल बी. डी कॉम आय
एम. सी. डी. आय. आय. डी. एम. ए. डी
जे. ॲडव्होकेट हायकोर्ट, दादर २८

## काहीच नाही माझे सारे तुझेच साईदत्ता

काहीच नाही माझे सारे तुझेच साईदत्ता
दिसती मजला अनंत रुपे तुझ्यात अनंता
आदि आणि अंती तूच एक साई भगवंता
माझे मन झाले शांत तुझे नाम घेता
आप्त निघून जातील आपले काम संपता
म्हणूनी सारे जीवन वाहतो मी तुझ्या पदा
भेट देईल श्री साई श्रध्देला जतन करिता
काहीच नाही माझे सारे तुझेच साई दत्ता
चौऱ्याशीचा फेरा चुकविण्या सोडली अहंमन्यता
विनम्र होऊनी राहिलो त्यजुनी माझी अस्मिता
सेवा करूनी घ्यावी साई हिच विनंती आता
काहीच नाही माझे सारे तुझेच साई दत्ता

—**श्री. रमाकांत पंडित** प्रभास्मृती, भाऊदाजी रोड, माटुंगा, मुंबई १९

## श्रीसाई दर्शन

जय जय साईनाथ साई ।
जय श्री सद्गुरु साई ॥ ध्रु० ॥
झाली प्रेरणा शिरडीस जावे ।
साई प्रभुचे दर्शन घ्यावे ।
जन्माचे या सार्थक व्हावे ।
योग त्वरीत येई ॥ जय जय ॥ १ ॥
शिरडीमध्ये प्रवेश करिता ।
मूर्ती साईची नयनी बघता ।
अति आनंदे ऊर दाटतां ।
नेत्री नीर येई ॥ जय जय ॥ २ ॥
पादुकांवरी मस्तक ठेवूनी ।
समाधिकडे ध्यान लावूनी ।
अनन्य भावे लीन होऊनी ।
हांक मारिली साई ॥ जय जय ॥ ३ ॥
पाठीवरूनी हात फिरविला ।
मस्तकावरी तसा ठेविला ।
साईनाथ हा धांवत आला ।
अपूर्व नवलाई ॥ जय जय ॥ ४ ॥
घ्यावी भिक्षा साई पासुनी ।
म्हणून बैसले पदर पसरुनि ।
साई माऊली प्रेमे हसुनि ।
कृपा दान देई ॥ जय जय ॥ ५ ॥
समाधी मंदीरी केली वसती ।
पायी हिंडले रस्तो रस्ती ।
मशीदमाईत अखंड ज्योती ।
धन्य शिरडी होई ॥ जय जय ॥ ६ ॥
मन गहिवरले शिरडी सोडतां ।
श्री बाबांचा निरोप घेतां ।
दया येऊनी साईनाथा ।
संगति आमुच्या येई ॥ जय जय ॥ ७ ॥

—सौ. प्रेमला शंकरराव मैराळ, 'हेरंब' गणेशबाग, मैराळवाडी, बडोदे

## साईबाबांचे दर्शन

बाबा साक्षात् दत्ताचा अवतार
गोदा तीरी शिर्डी क्षेत्री त्यांनी केला चमत्कार।
बाबा मानव देही प्रगटले
त्यांस मोहपाशाचे बंधन कसले
साईचे वर्णन करण्याची लाभली मज संधी
डोक्यास त्यांच्या मळकी चिंधी
अंगात त्यांच्या फाटकी कफनी
भस्म विभूती नव्हती बाबांच्या भाळी
कर त्यांचे गुडघ्या खाली
काखेत त्यांच्या सटका
हाती त्यांच्या भिक्षापात्र
चरण त्यांचे सदा नागवे
अशा ह्या बाबांचा काय वर्णावा थाट
माझ्या मुखी त्यांच्या नामाचा नित्य पाठ।

—सौ. वसुंधरा रामराव चोरे ६/८९३–सी. डॉ. आंबेडकर रोड,
दादर, मुंबई–१४

## 'अंतरीची आस'

साई माझे मन लागो तुझे ध्यानी
संसार तापे श्रमलो या जीवनी ॥
आता आहे एक आस,
तुझ्या रुपाचा लागो ध्यास,
श्वासो-श्वासी तुझे नाम,
मुखी तुझे लीला गान,
नको काशी नको चारी धाम
तुझ्या चरणी मना विश्राम
संत संग लाभो सदा
तुझ्या पदी दृढ श्रद्धा
जगू म्हणे साई नाथा
पुरवावी अंतरीची आस आता ॥

—श्री. जगन्नाथ नारायण कुलकर्णी ७१ स्वाती सोसायटी, श्रीसाई सदन
पद्मावती पुणे. ९

# जय साईनाथा!

जय साईनाथा, तुझ्या आलो मी दर्शना, चित्तवृत्ती ही बहरली।
मंदिरी मी येतां, तुझें दर्शन श्री घेतां, माझी तहानभूक हरपली॥

धांवत शिरडी आलो
दर्शने पवित्र झालो
तव प्रेमाने न्हालो
साईनाम घेतां, तुझी गुणकिर्ती गातां मनोभावना मोहरली।
मंदिरी मी येतां तुझें दर्शन श्री घेतां, माझी तहानभूक हरपली॥

तुझे नाम हे मन्मनी
मस्तक माझे श्रीचरणी
श्रद्धा सबुरी ठेऊनी
घेतां हे दर्शन देवा, तृप्त झाले मन, माझी काया ही हरखली।
मंदिरी भी घेतां तुझें दर्शन श्री घेतां, माझी तहानभूक हरपली॥

भक्तजनांचा कैवारी
शिरडीचा गिरीधारी
दुःख संकटाते हारी
नाम त्याचे घेतां, रक्षि उठतां बसतां, साई शक्ति ही अवतरली।
मंदिरी मी येतां तुझें दर्शन श्री घेतां, माझी तहानभूक हरपली॥

तुझ्या कृपेची छाया
लाभू दे मज माया
जीवन उद्धाराया
परत मी जातां, तुझा निरोप हा घेतां, मम पाऊले जड झाली।
मंदिरी मी येतां, तुझें दर्शन श्री घेतां, माझी तहानभूक हरपली॥

—श्री. दा. र. दळवी
५/७८, बी. पी. टी. कॉलनी
रेनॉल्डस रोड, वडाळा, मुं. ३७

# साईमाऊली

पंच पंच उषः काली
वंदावी साईमाऊली...॥ ध्रु ॥

कल्पवृक्ष चिंतामणी
हेही हीन याच्याहुनी
सुखद संसार याचा
याच्या निरंत चिंतनी,
सर्व तीर्थे या पाऊली...॥१

कामक्रोध लोभातून
नरकाची दारे तीन
याच्या नामाच्या गजरी
ओलांडून जाई दीन,
चला चला हो राऊळी...॥२

तुम्हा कळो वा नकळो
सांभाळ करी सावळो
अगाध गा याची माया
हार हा माळो न माळो,
आदीशक्ति ही जागली...॥३

—श्री. **दत्ता कदम** एम. ए.
५७८ चव्हाण अपार्टमेंटस,
जंगली महाराज रोड, पुणे.४

## तुम्ही सर्व प्रभूचे रूप

शिरडीच्या राऊळात
बाबा का हो झोपले!
मागे आत्मा ठेऊनि ते
सांगा का हो गेले?
खरंच का हो गेले बाबा
तुम्ही तरी सांगा
तेली येथील चळले ती
म्हणून आले रागा!
तेली तुम्ही आम्ही सगळे
सगळेच आम्ही चळलो
अध्यात्माची बाबांची ती
शिकवण पार विसरलो!
जन्मभर तीच शिकवण
दिली साई बाबांनी
हाडे त्यांची तुर्बती मधुनि
थकली सांग सांगुनी
'विसरू नका बाळांनो, माझ्या
तुम्ही सर्व एक
एक म्हणजे एकच एक
प्रभूचेच रूप!'

—श्री. रघुनाथ शंकर जुन्नरकर
५ वसंत अपार्टमेंटस, कस्तुर पार्क,
बोरीवली (प.) मुंबई ९२

## अपरंपार कृपा

कृपा अपरंपार प्रभु तुझी कृपा अपरंपार ।
तुझ्या कृपेला नसे अंत ना पार ॥ धृ० ॥
तुझ्या कृपेच्या अपूर्व शक्ती ।
उद्धरिल्या तू कितीक व्यक्ति ।
साक्ष त्याजला तुझ्याच उक्ति ।
आमुचा तू कर रे बेडा पार
प्रभु तुझी कृपा अपरंपार ॥ १ ॥
त्याच कृपेच्या जोरावरती ।
तुकयाचे ते अभंग तरती ।
निघे शिळेतून अहिल्या सती ।
मुळी त्याजला नाही पारावार ।
प्रभु तुझी कृपा अपरंपार ॥ २ ॥
पाऊस वारा अग्नी वरती ।
सत्ता चाले तुझीच पुरती ।
तुझ्याच शब्दे भुजंग दबती ।
प्रारब्धही ते पळे दूरवर ।
प्रभु तुझी कृपा अपरंपार ॥ ९ ॥
कधी राम तू दिसशी कुणाला ।
विठ्ठल रुपे वर तू दिधला ।
धरशी कधी तू गुरु रुपाला ।
कुणा भासशी उमाशंकर ।
प्रभु तुझी कृपा अपरंपार ॥ ४ ॥
वास तुझा रे कधी मशिदी ।
कधी चावडी कधी गुरुपदी ।
रुप साजिरे कधी जलाब्धी ।
राहशी भवनी तू विश्वंभर ।
प्रभु तुझी कृपा अपरंपार ॥ ५ ॥

—सौ. अस्मिता कमलाकर दांडेकर
६९, वी. खाडिलकर रोड,
गिरगांव, मुं. ४

# अगाध महिमा तुझा

अगाध महिमा तुझा साई रे अगाध महिमा तुझा ॥ धृ ॥

लिहावया तव महिमा साई
करू काय सागराची शाई
त्रिभुवनाचा कागद पाही
साई रे अगाध महिमा तुझा ॥ १ ॥

तू जगताचा चालक पालक
तू सकलांचा भवभय हारक
तूच शरणागतांचा तारक
कृपा असावी सदा
साई रे अगाध महिमा तुझा ॥ २ ॥

मी तव चरणा पाशी आलो
तुझाच आता होऊनी गेलो
नसे तुझ्याविण कोणी मजला
तारावे शंकरा
अगाध महिमा तुझा साई रे
अगाध महिमा तुझा ॥ ३ ॥

—श्री. शंकर सदाशिव कुलकर्णी
२४६५ ए वॉर्ड वरुणतिर्थ वेस, कोल्हापूर २

# मागणे

-※-

साई साई साई साई
मजला अन्यची दैवत नाही ॥ १ ॥

बालपणी मी साई पाहिले
मांडीवरीही बैसुनी आले
साई दर्शने कृतार्थ झाले
भाग्यची माझे उदया आले ॥ २ ॥

सदैव वाटे शिरडी जावे
डोळे भरूनी रूप पहावे
श्रद्धेने त्या गुरुसी नमावे
सबुरीने मग अनुभव घ्यावे ॥ ३ ॥

प्रभु स्वरूप ते मनी स्मरावे
साई साई नाम जपावे ,
वाटे मुक्ती पद पाकळे
साई चरणी विलीन व्हावे ॥ ४ ॥

बाबा मजवरी कृपा करावी
मृत्यू समयी शांती मिळावी ॥ ५ ॥

—सौ. सरोजिनी मुळये
नाथ मंदीर कॉलनी
इंदूर ( मध्यप्रदेश )

# श्री साई आराधना

धाव पाव साई आई ऐक माझी विनवणी
मी भुकेली तव मायेची पुरवी आस मनीची ।।

तूच माझा गणपती तूच माझा कुळपती
तूच माझी सरस्वती देई मज अमृतवाणी ।।

तूच माझी विठाई तूच माझी प्रिय जननी
सद्वचन तव येई श्रवणी करी मज सद्गुणी ।।

येई विपत्ती चहुबाजुनी चैन न पडे अंतरी
तुझी आठवण धीर देई मम त्रस्त मनी ।।

सुंदर पवित्र समाधिस्थानी रमले असता चिंतनी
तुझेच दर्शन देई साई स्वर्ग–सुख मम लोचनी ।।

शिरडीवासी तू जगदीशा येई धावोनी त्वरी
असो देत तव वरदहस्ता सतत माझ्या शिरावरी ।।

मी अजाण बालक मजवरी करी कृपेची साऊली
पावन करी याच देही तुझिया चरणकमली ।।

ऐक माझी विनवणी

—सौ. अनिता अनिल कोरडे
१८, काकडवाडी, ४ था मजला
गिरगाव, मुंबई नं. ४

## धन्य ती द्वारका माई

धन्य ती द्वारका माई ।
ब्रह्मीभूत तेथे हा साई ॥ १ ॥
तिथे प्रज्वलित धुनीमाई ।
ज्योति जळती अखंड समई ॥ २ ॥
घंटा नाद हा कानी येई ।
इथेच चिर विश्रांति साई ॥ ३ ॥
भक्त राजवीती पालखी माई ।
रथोत्सवाची इथेच घाई ॥ ४ ॥
अखंड पारायण चरित्र साई ।
श्रद्धा सबूरीची प्रचिती येई ॥ ५ ॥
धन्य ती द्वारका माई ।
ब्रह्मीभूत येथे श्रीसाई ॥ ६ ॥

—**सौ. उषा प्रभाकर मुळे**, नारायण पेठ, पुणे


शुभ विवाहासाठी लागणाऱ्या पूजेच्या, होमाच्या, ए टू झेड वस्तु
दादरमध्ये मिळण्याचे ठिकाण एकच

**रमेश एम्पोरियम**

४५, किर्तीकर मार्केट,
दादर मुंबई ४०००२८.
नाशिंग-मुंडावळीचे मोठे व्यापारी

**आता आकर्षक बॉक्स पॅकींगमध्ये**
**श्री सत्यनारायण महापूजेचे**
**A to Z साहित्य**
**सर्व अगरबत्ती विक्रेत्याकडे मिळेल.**

# तु माझा त्राता

☆ ☆

उभा पाठीशी तू असताना, कसली मज चिंता ?
सद्‌गुरू तू माझा त्राता ॥ धृ ॥

आजार अथवा दुखणे, खुपणे–
असो कुणाचे काही देणे–
खंत कशाला त्याची करणे ?
कृपा छत्र तव सदैव माझ्या, शिरावरी असता–१

मार्ग नीतिचा कशास सोडू
स्वार्थासाठी कशास भांडू ?
उणे कुणाचे कशास काढू ?
तुझ्या सारखा समर्थ असता, मम रक्षणकर्ता–२

तीर्थरूप तूं तूचि माउली–
तूच निवारा, तूच सावली–
धावतोस तूं संकटकाळी–
तुझ्याविना मज दुसरा कोणी, नसे दुःखहर्ता–३

—श्री. शंकर इनामदार
टी ६।१ मंडाले लाईन्स,
रेंजहिल्स, खडकी पुणे २०

# साई साई म्हणता

साई साई म्हणता म्हणता
धावलासि तूच बाबा
संकटातुनी मुक्त करण्या
तारितोसि तू भक्तांना ॥ १

तुझीच किमया आणि लीला
अपार आहे अन्त न त्याला
तुझ्या गुणांचे वर्णन करण्या
मानव आम्ही अपूर्ण बाबा ॥ २

महान आत्मा तूचि बाबा
शिकविलीस तू मनुचि समता
आणि घडविले तू निर्भय भक्ता
तू तोषविसि दुःखी दीना ॥ ३

तुझ्या शक्तीच्या अथांग शोधा
अनेक भक्त करिति चिंतना
पावतोस तू त्यांना सत्वरा
दयाघनारे तूच सगुण घनता ॥ ४

अनन्ता तुझी कीर्ति करुणा
शब्द न पुरति तव वर्णाया
कृपा असू दे तुझी दयाघना
भवनदी ही पार करण्या ॥ ५

—श्री. प्रभाकर कोळमकर
गुंफादर्शन, फर्स्टकार्टर रोड, बोरीवली

# सगुण रूप मज दाखविले

सात जन्मी जे पुण्य लाभले
ते अजि फळास आले

साईंनी सगुण रूप मज दाखविले
'पुंडलिक' नामे 'साई' मज भेटले

तसबिरीतूनी दर्शन मज दिधले
देहभान मी हरखून गेले

तन, मन, धन अर्पून मी
तव दर्शनाचा ध्यास धरीला
अन् 'साईपुंडलिका'ने मज निरोप धाडीला

आत्मानंदाने मी हरपून गेले
अजि साईंनी मज सगुण रूप दाखविले

रात्रंदिन मज एकच ध्यास होता
देवा, सगुण रूप मज कधी दाखविता

पाहूनी माझा अति उत्कट भाव
प्रगटला माझा 'साईपुंडलिक' देव

धन्य आजि दिनी, उदेले मम भाग्य

—सौ. शशिकला रेवणकर
कुंटोली, अंबरनाथ

# त्या साईकडे जरी वळा....

(स्त्री) संवाद (पुरुष)

का उदास बसला तिथे !
चहा निवेल आता इथे,
हा उगाच माझ्या मते,
नाद हा मनी असा गवसते
हे काय असे बोलणे,
तुम्ही पुरुष, आणि का उणे,
किती मजेत खाणे पिणे,
सोडुनी, उदास का बैसणे !
ही कितीक नाजुक मुले,
जणु देवावरची फुले,
तया बघुन मन हे डुले,
ते तुम्ही कधी का पाहिले,
ही व्यर्थ काळजी असे,
तो दयार्द्र वरती असे,
तो तुम्हास कैसा हसे,
हा उदास, उणि का बसे,
हा समाज सारा खुळा,
तया नसेही काही कळा,
त्या साईकडे जरी वळा,
तो करे तुम्हा अहा सबळा

तो चहा नको मुळी मला,
हा जीव आता उबगला,
मी काय करू न कळे मला,
मन, आता करी गलबला
मी पुरुष हे ग खरे,
परी जिवाशी काही न उरे,
हे काम असे अपुरे
जीव हा तयात सारा फिरे
ह्या पुरे वस्त्र ही नसे,
आणि खाऊ कधीही नसे,
हे होती मोठे मोठे जसे,
जीव हा उदास ग होत से
ते आम्हास सारे कळे,
तरी मन आता चळवळे,
हे उगाच अवसान बळे,
काळज्या जिवासी ह्या न टळे
हा एक असे सुविचार,
हे तत्व असे मंजुर,
जरी भजन साईधर,
तरी तरेन भवसागर

–श्री. प्रकाश प्र. कर्पे
२४, रामबाग, इन्दोर

# मशिद्‌माय

अगाध आणिक अगणित लीला
ज्या ठायी बसुनि दाविली
पवित्र द्वारका मशिद माऊली
तिथे साईंची नित्य साऊली...१

अग्नीपुजा अखंड चालते
दीपावली तशी उजळते
तिथे न राही कुणी भुकेला
जातीभेद पंथ निमाला....२

पाषाणाचे तिथे सिंहासन
रिक्त नसे ते अजुनी स्थान
साईराजाचा भरे दरबार
अदृश्य रूप पाही कारभार...३

चावडीतही ध्यान आसन
एक दिसा आड शयन
विभूती सांगे साईवचन
अल्ला तोची असे नारायण...४

किती गावे श्रीसाई गुणगान
जिव्हा करते अमृत पान
साईचरणी जडो ध्यास
साईनामी अखेरचा श्वास!...५

—कु. शशिकला साळगावकर
सोलापूर

# आवो साई

सोनियाचा दिवस उगवला ॥ धृ ॥

पूर्व दिशा हंसली ।
नवरंगाने प्रभात फुलली ।
आली गगनावर लाली ।
उगवला शिलधीचा भाग्य रवि ॥ १ ॥

सुटला वायु मंद सुगंध ।
वृक्ष वेलींनी भरला रंग ।
पक्षी गाती मंगल गीत ।
आली वनदेवी हसत ।
करण्या परब्रह्माचे स्वागत ॥ २ ॥

वाजत गाजत शिरडी नगरी ।
आली लग्न वरात ।
वऱ्हाड संगे सामोरी होता ।
बाल फकीर हंसत ।
आला भक्त सखा धावत ॥ ३ ॥

खंडोबाचा भगत पुजारी ।
दिसता तेजोमय फकीराची स्वारी ।
पाहुनी वंदिला 'आवो साई'।
प्रगटला साईनाथ अवतार ।
जय जय साईनाथ अवतार ।
जय जय साईनाथ अवतार ॥ ४ ॥

—सौ. शांता अंबाजीराव सरोदे
उद्धेगल बि. नं. ६ खोली नं. १०
एन. सी. केळकर रोड दादर मुंबई २८

# साईनाथ गुरु हा

(वृत्त : शार्दूल विक्रिडीत)

शिरडीचा बघ साईनाथ गुरु हा, वाटे चमत्कारिक
आहे हिन्दु कि हा असे यवन हे नाही कुणा ठाऊक
येई धावत माऊली सम पहा, भक्तास देण्या सुख
साईच्या शिरडी म्हणून जन हो, येती बहू भाविक ॥१॥

साई साई सदा मनी जपकरा, येई प्रचिती पहा
ज्ञानाचे घट पाजण्या गुरुरुपी, साईच धावेल हा
शंका किन्तु मनी नसो अतुट ती, निष्ठा सबूरी हवी
पूजा ढोंग नको, नको धनहि ते, निःस्वार्थ भक्ती हवी ॥ २ ॥

सांगे हा गुरू साधकास करण्या, ह्या दोन गोष्टी परी
ह्या अस्थीर मनास बांध नसता, कोणा कदा नावरी
अंगी संयम आणताच पळुनी जाईल बद्ध स्थिती
मिळवी साधक ज्ञान पान करण्या, ती योग्य ऐसी स्थिती ॥ ३ ॥

—श्री. मधुकर गजाननराव अंबाडे
अंबाडे निवास, लकडी पुलासमोर
दांड्या बाजार, बडोदे ३९०००१

## ताईसाहेब निमोणकर यांचे देहावसान

नगरचे विख्यात साईभक्त कै. नानासाहेब निमोणकर यांची सून श्रीमती लक्ष्मीबाई नागनाथ देशपांडे उर्फ श्री. गं. भा. ताईसाहेब निमोणकर यांचे ११–१२–८२ रोजी निधन झाले. त्यांचे वय पाऊणशेच्या आसपास होते. शिरडीत त्या हरहमेशा बाबांच्या दर्शनास येत असत. त्यांची स्मृती शेवटपर्यंत चांगली होती. त्यांच्या बोलण्यातून श्रीसाई समकालीन अनेक व्यक्तींच्या आठवणी ऐकावयास मिळत असत. श्री साईबाबा संस्थान व आम्ही त्यांच्या कुटुंबियांच्या दुःखात सहभागी आहोत.

श्रीसाई मृताच्या आत्म्यास चिरशांती व सद्गती देवो.

# शरण त्या जावे साईनाथा

शरण त्या जावे साईनाथा
त्यजुनिया देहाची ममता ॥ चाल ॥

करावा विचार देहाचा
गोठा हा मलमूत्राचा
पुतळा रूधिर मांसाचा
भरवसा क्षण नसे याचा ॥ १ ॥

शोधुनि पहाता जगतीचा
तुजविणा कोणी नसे आता
वास्तव सोडूनिया अहंता
शरण मी आलो साईनाथा
राजा म्हणे सावध हो आता
शरण त्या जावे साईनाथां ॥२॥

—श्री. राजासाहेब देशपांडे,येल्लारेड्डी
जि. निजामाबाद ( आंध्र प्र.)

## चला जाऊ शिरडीला

चला जाऊ शिर्डीला साईमाऊली भेटीला
लागली जीवाला ओढ मन झाले आतूर
वर्ष वाटते युगासम केव्हा भेटेल साईराम
आला आला वारा शिर्डीचा निरोप घेऊनी साईचा
देव भावाचा हो भुकेला साई भक्तीचा हो भुकेला
नको संसाराची चिन्ता नको उद्याची ती वार्ता
आता ओढ एक साईभक्ता भेटेन कधी साईरामा
आली संतमंडळी जमली भक्त मंडळी
भोजन तत्वबोधाचे भजन प्रेमा अमृताचे
गाऊया नाचुया साईनामे रंगु या

—ह. भ. प. सौ. कलावती ब. चव्हाण
अंबाबाई मिल्स निवास बी. ६
सेनापती बापट मार्ग, दादर मुंबई २८

# ' अहंब्रह्मास्मि '

भूत आणि भविष्य
या मधला
मी म्हणजे वर्तमान
भूतकाळाचे स्मरण नाही
भविष्यकाळाची चाहुल नाही
वर्तमानमध्ये वावरणारा
मी—
खरेच मी—मी आहे काय?
निळसर दिसणारे आभाळ
त्यात उडणारे रंगी बेरंगी विहंग
तसेच
निळसर सागरांत उठणारे तरंग
हे सगळेच आहे काय?
आणि—
भोवतालची जाणीव अनुभवणारा
प्रपंचात गुरफटणारा
सुखदुःखाची चाहुल घेणारा
मी म्हणजे वर्तमान
अहं—
लौकिकात नाही-
मी आहे पण
अलौकिकात
' अहं ब्रह्मास्मि '

—श्री. राधाकृष्ण गुप्ता ' चेतन '
पाटकरवाडा, भगतसिंग पथ,
डोंबिवली ( पूर्व )
४२१२०१ जि. ठाणे

# साई शिर्डीवाले

ओळखले कां सांगा यांना
तुमच्या दारी आले
अहो हे साई शिरडीवाले ॥धृ॥

अंगी कफनी शुभ्र घातली
डोईस जो फडके गुंडाळी
निंबातळी बसले ॥१॥

भव्य मूर्ति ही आजानुबाहू
पायावरती पुष्पे वाहू
दारी साई आले ॥२॥

पाहून पाहून देती दवा
हाते यांच्या गुणहि यावा
धन्वंतरी इथले ॥३॥

यांस आवडे भाकर कांदा
अल्ला मालिक सदैव तोंडा
विठ्ठल पंढरीवाले ॥४॥

असे सर्व हे स्वप्नी घडले
दारी माझ्या साई आले
' भिक्षा वाढ ' म्हणाले ॥५॥

—श्रीमती श्री. शहाणे
गडकरी पथ डोंबिवली

# कोण कोठला एक फकीर !

कोण कोठला एक फकीर हा शिरडीला आला
आणि अगणित भक्तगणांचा परमेश्वर झाला ॥ धृ. ॥

योग्यांनाहि नाही लागला अजून थांग ज्याचा
सामान्यांना सांगा कैसे लागे थांग त्याचा
तो परमेश्वर भक्तांसाठी शिरडीमध्ये प्रगटला ॥ १ ॥

नाव गाव ते काय तयाचे जात धर्मही नव्हते ठाऊक
एक वऱ्हाडासवे की आला बालयोगी हा अगदी अचानक
'आओ साई' म्हणुनी बोलता प्रसन्न मग हसला ॥ २ ॥

आवडला हा अवघा परिसर आवडले हे भोळे भक्तजन
पाहुनि त्यांचे दुःख दैन्य ते सवेच द्रवला हा दुःखभंजन
उद्धरण्याला या सकलांना इथेच मग रमला ॥ ३ ॥

अनन्यभावे जे जे जाती शरण साईनाथा
सफल होती ते पूरितकामा विरुनी सर्व व्यथा
प्रतिदिवशी ही प्रत्येक अनुभवी अजब साईलीला ॥ ४ ॥

विज्ञानाच्या युगात मानव भोगी भौतिक स्वर्ग सुखाला
वंचित परि जाहला हा मानव चिरशांतीमय आत्मसुखाला
ती सुखशांती साईचरणी या मिळे 'नागेशाला' ॥ ५ ॥

--श्री. नागेश मोगलाईकर,
'नागलक्ष्मी' २८१०, ग. नं. ४
धुळे ४२४००१

# श्रीसाईगीत

श्री सद्गुरु साईबाबा
अवतार हा परमेशाचा ऽऽऽ ध्रु. ॥

श्री सद्गुरु साईबाबा
शिरडी स्थानी वसती त्यांची
साई दर्शना जन हे येती
इच्छित कार्य सफलचि होती
प्रभू चरणा वंदूनि ऽऽऽ
श्री सद्गुरु साईबाबा ॥१॥

दर गुरुवारी यात्रा भरुनि
पंचामृती पूजा समर्पूनि
धूप दिप नैवेद्य करुनी
भर भारा आरती करीती
श्री सद्गुरु साईबाबा ॥२॥

प्रभू कृपेचा लाभची व्हावा
वरद हस्त हा शिरी ठेवावा
अल्पमती मी मूढमती मी
लीला बाला सांभाळा मजला
सद्गुरु सांभाळा मजला
श्री सद्गुरु साईबाबा ॥३॥

—श्रीमती लीलावती गुजराथी, शिरडी

# 'मला वाटतं माहेरी जावं'

बाई या संसारात किती दीस राहाव
मला वाटतं माहेरी जावं ....ध्रु.

माझ माहेर शिरडी गांव
माय बापास वाटतं भेटावं
लयी दीसान भेटत्याल बहीण भाव
मला वाटतं माहेरी जावं ...१

किती दीस करू ग संसार
लक्ष चौऱ्यांशीचा नको ग फेर
खालीवर होतोय माझा जीव
मला वाटतं माहेरी जावं ...२

माझ्या माहेरची भाजीभाकर
वाटतं खाऊन घ्यावी पोटभर
माझ्या बाबांचा माझ्यावर जीव
मला वाटतं माहेरी जावं ...३

बाबा पुरवा हो माझी हौस
मला घेऊन जाहो माहेरास
सांगा मी ही संसारात किती दीस राहाव
मला वाटतं माहेरी जावं ...४

—सौ. प्रमोदिनी डी. पोतनीस
पिंपरी, पुणे–१७

# मुजरा

☆ 卐 ☆

अनंतातले दैवत साई, मांगल्याचा मुक्त झरा
त्रिभुवनाच्या गुरु साईला, मानाचा मुजरा —धृ—

मूक शब्दांची गुंफुनि माला
आळवितो हा भक्त एकला
तव नामाचा प्राशुनि प्याला
मंगलतेने जीव नाहला
तुझ्या मुखातुनि शब्द बरसले, होऊनि अमृत धारा —१—

शब्द तुझे हे तुलाच गाती
या देहाची तुजशी नाती
प्रकाश सारा तुझ्याच हाती
भक्तीने त्या तेविती ज्योती
या देहाच्या कणाकणावर, तुझ्या कृपेचा वारा —२—

तुझ्या हातांनी तुझीच सेवा
तुझ्या मुखाने करितो धावा
आदि अंत तो तुझ्याच गावा
वल्हव आता बुडत्या नावा
तन-मन मी पण सारे तुझेरे, तूच जगीया सारा —३—

—श्री. डी. बी. जगतपुरिया
शिरुड (सें. रेल्वे) ता. जि. धुळे

# साईनाम

卐 ❀ 卐

तुझे नाम घ्यावे मुखी साईनाथा
आणि ती स्मरावी तुझी भावगाथा ॥ ध्रु. ॥

कृपाळू अनंता समाधिस्त होशी
परि हाक देता धावूनिया येशी
कर जोडोनिया नमवितो माथा ॥ १ ॥

क्रोध–मोह सारे कथा मीपणाची
वाढविती बा रे व्यथा जीवनाची
सारे लोप होती साई आठविता ॥ २ ॥

प्रपंच्यात साऱ्या समस्या निराळ्या
अंतरी सुखाच्या कल्पना त्या भोळ्या
साईगंध स्याता दूर होई चिंता ॥ ३ ॥

—श्री. ग. रा. पालकर
२२३/२, दारुवाला चाळ,
बझार वॉर्ड, कुर्ला ७०

# साई इच्छा बलियेसी

व्यर्थ कितीही कुणी मोजता
पापपुण्याच्या राशी
कर्ता करविता साई परमात्मा
साई इच्छा बलियेसी ॥ १ ॥

नितांत आणि अढळ 'श्रद्धा'
सदैव साईचरणाशी
मन्मनी तरी का पटते
'सबुरी' ती अपुरीशी ॥ २ ॥

परका येथे कुणी न वाटे
जवळे साईपंथाशी
जन्मोजन्मींच्या जुळती गाठी
रक्तापेक्षा हृदयाशी ॥ ३ ॥

देणे घेणे ना कुणास काही
हेवेदावे नाही कुणाशी
जग माझे मी जगाचा
अर्थ जयाचा 'साई'शी ॥ ४ ॥

—श्री. विजय द. हजारे एम. ए.
सी/६, गुंफादर्शन फर्स्ट कार्टर रोड
बोरीवली पूर्व मुंबई ६६

# साई प्रसाद

मी बाई जाते जाते शिर्डीला
साईच्या आता दर्शनाला –धृ–

शिर्डीचे साईबाबा सांगे हो मजला
जरी घेतली समाधी तरी पावेल नवसाला
भेटीसाठी जीव माझा अधीर बाई झाला –१–

मनापासोनी साईबाबांचा धावा मी केला
नाही पोटी संतती लाभ द्यावा हा मजला
गरिबाचा वाली साई धाऊन तो आला –२–

दिले पोटी रत्न जीव समाधानी केला
खेळे मांडीवरती बाळ आनंद बहू झाला
कसे विसरु सांगा आता साई चरणाला –३– मी बाई

ध्यानी मनी स्वप्नी साई दिसे बाई मजला
हितगूज सारे माझे सांगे हो त्याला
देह माझा अर्पण केला माझ्या साईला –४– मी बाई

जो साई चरणामध्ये सदा लीन झाला
कसा तारील साई भक्ताला नकळे कोणाला
जीव प्राण सारा माझा आहे शिर्डीला –५– मी बाई

दत्तू म्हणे साईबाबा ज्याला प्रसन्न झाला
देई उदी हा प्रसाद साऱ्या आपल्या भक्ताला
वारंवार वंदन करतो माझ्या सद्गुरुला –६– मी बाई

—श्री. दत्तात्रय महादेव मोरे
४७० शिवाजी नगर पुणे ५

# साई कधी आकळेना

काय मागणे मागावे
बाकी काहीच उरेना
दिले सारेच तू साई
आता मागणे सुचेना
दिले आयुष्यात सुख
आणि सारे समाधान
तुझ्या कृपेनेच साई
चाले संसार हा छान
नाही कशाचीही आस
नाही कशाचीही वाण
झाले जीवन सार्थक
जसे सोनियाची खाण
तुझे माझे साईनाथा
जन्मोजन्मीचे रे नाते
तुझ्या माझ्या अंतरात
भक्ती वात्सल्यात न्हाते
माझ्या मागण्या पेक्षाही
तुझे दानशील मन
साई कधी आकळेना
तुझे कुबेराचे धन !

—श्री. रमेश डी. चव्हाण
साईनिकेतन, गुजरलेन
मु. पो. ता. नवापूर जिल्हा धुळे
नवापूर पिन ४२५४१८

# जिवीचा जिव्हाळा

जिवीचा जिव्हाळा
अंतरीचा उमाळा
साई तुझ्या नामाचा
माझ्या जिव्ही ळळा १

अंतरीचे कढ
वाटती न जड
साई तुझ्या नामे
तरुनी जाई दगड २

मी मतिमंद
तुझ्या द्वारीचा दगड
ज्याचा उद्धार
साई रामे केला ३

उद्धार करूनी
दीक्षा ही देऊनी
देई वैराग्य विवेक संपदा
संपदा ही न संपू दे देवा
हेचि माझे मागणे तारी या जीवा ४

—श्री. अनिल केशवराव रसाळ
बी. पी. टी. क्वार्टर्स, रेनॉल्डस रोड, वडाळा

# शिरडीचा साईराजा

(परवशता पाश दैवे)

चला जाऊ शिरडीला
पाहू देव आपुला
शिरडीचा साईराजा
सिंहासनी पाहिला –धृ–

असूनी खास मालक आपुलां
उणे ना कशाला
शिरडीचा साईराजा
सिंहासनी पाहिला –१–

तीर्थ यात्रा सर्वच तेथे
साईशा पदाला
शिरडीचा साईराजा
सिंहासनी पाहिला –२–

रीकामी न थाळी कदापी
देई तो भक्ताला
शिरडीचा साईराजा
सिंहासनी पाहिला –३–

भक्तांच्या प्रेमासाठी
देव हा भूकेला
शिरडीचा साईराजा
सिंहासनी पाहिला –४–

दास म्हणे श्रीसाई चरणी
देह हा वाहिला
शिरडीचा साईराजा
सिंहासनी पाहिला –५–

—श्री. डी. बी. पोतनीस
पिंपरी पुणे १७

# नाते

साईला ना आई
बाप ना साईला
का हा दावा केला
कुळथावाणी ?
साईला ना धर्म
साईला ना जात
नाही गणगोत
असे कसे !
आम्ही भक्त सारे
त्याचे मायबाप
आम्हा मायबाप
साईनाथ
आम्ही भक्त सारे
त्याचे गणगोत
साई धर्मजात
भक्ताचीच
जगा वेगळे हे
साई भक्त नाते
मरे तो लाभते
साईभक्ता

—श्री. ग. दे. कुळकर्णी
'कुलदीप', तांबरी, उस्मानाबाद

# साई कृपा

******

साई तू कृपावंत
तूच अमुचा भगवंत
तू आहे जगन्नाथ
म्हणती तुजला साईनाथ

मनामध्ये जमले ढग
दुःखाची जरी आहे धग
विसरून जातो त्याचा रंग
होता साई तुझाच संग

उघडे तुझे सदैव दार
कृती तुझी सदा उदार
कुणा न केले तू दूर
तव स्मृतीने भरतो ऊर

नाही अंत तव लीलेला
तृप्त होतो सदा भुकेला
दुःख व्याधीने पिडलेला
किती भक्तांना उद्धरीला

घ्यावा माझा तुम्ही प्रणाम
मुखात राहो तुझेच नाम
साईराम प्रभु साईराम
एकच नाम मज एकच धाम

—श्री. सूर्यकांत मा. गर्जे
आखाडे बिल्डिंग, शिवाजीनगर, पुणे ५

# नाचे सदा साई सद्गुरू

भक्तीचा वाजे डम डमरू,
नाचे सदा साई जगद्गुरु
जगद्गुरु साई जगद्गुरु
नाचे सदा साई जगद्गुरु
मानस ज्याचे पापभिरू
साई तयाचा आधारू
जगद्गुरु साई जगद्गुरु
साईनाम हे सदा स्मरू
त्रस्तांचा भवताप हरू
भक्तांचा तर कल्प तरू
सद्गुरु साई जगद्गुरु
नामस्मरणा नित्य करू
जाऊनी त्याचे चरण धरू
विश्वाचा जो मोक्ष गुरु
जगद्गुरु साई जगद्गुरु
साईभाव हा हृदयी धरू
जगताचा साई डोलकरू
नेईल नौका पैलतिरू
जगद्गुरु साई जगद्गुरु
नामघोष हा नित्य सुरू
भक्तीचा वाजे डम डमरू
नाचे सदा साई जगद्गुरु
भक्तजनांचा घोष सुरू
नाचे सदा साई जगद्गुरु

—श्री. एन. जी. परुळेकर
केदार, ७२ अभिनव नगर
बोरीवली ( पूर्व ) मुं. ६६

## श्री साईलीला मार्च १९८३

- नेलोर येथे भरलेल्या २० व्या अखिल भारतीय साईभक्त मेळाव्याचा वृत्तांत.
- श्रीसाईबाबांच्या पादुकांचे मद्रास येथे झालेले भव्य स्वागत.
- श्रीसाईलीला ९ व्या लेखक-कवी संमेलनाचा सार्यंत सचित्र वृत्तांत.
- श्रीसाईबाबांच्या उदीचे आश्चर्यकारक थक्क करून सोडणारे भक्तांचे विविध अनुभव व उदीविषयक कविता.

● प्रत्येक अंक वाचनीय, ● प्रत्येक अंक संग्राह्य.

पाने ६४ किंमत–अवघी १ रु. वा. वर्गणी–१० रु.

Comments on Hindi Version of our Novel on Sai Baba are pouring in :

Junnarkerji, the novel is incomparable ! It's impossible to leave it once you start reading it. You have adopted a very attractive and beautiful style of writing. Equally beautiful is it's Hindi translation by Prof. Adya Prasad Tripathi. Hearty Congratulations !'–Thakur Bhapati Sinha, Principal, Patan, M. P.

'Junnnarkarji, your book is most interesting. It is re-incarnation of Sai Baba in book form !'–Shri AMRUT-LAL NAGAR, famous Hindi novelist, Lucknow, U. P. What more you want ? Buy your copy immediately.

**' प्रगटे मास्जिदमें साई भगवान ! '** Rs. 45/-

**'A MISSION DIVINE !'** in English Rs. 45/-

**' मशिदीत प्रगटला परमेश्वर ! '** In Marathi Rs. 40/-

Contact : 'PRASHANTI PRAKASHAN',
5, Vasant Apartments, Plot 47, Kastur Park,
Shimpoli Road, Borivali (W.) Bombay 400 092.
Postage for Each Rs. 4-50

# शिरडी वृत्त माहे-डिसेंबर १९८२

या महिन्यात नाताळाचे सुट्टीमुळे श्रीसाईनाथांचे दर्शनासाठी साईभक्तांची गर्दी फार होती. शाळांच्या व कॉलेजच्या एशियाडच्या सुट्टीमुळे गर्दी होती. शाळा, कॉलेज, कारखान्यांच्या सहली बऱ्याच प्रमाणात होत्या.

काही कलाकारांनी श्रींचे पुढे हजेरी दिली, ती खालीलप्रमाणे-

**कीर्तन**— १) ह. भ. प. सदाशिवबुवा पुराणिक, आळंदी, जि. पुणे

**प्रवचन**—१) ह. भ. प. देशमुख महाराज, शिर्डी
२) ह. भ. प. जगन्नाथ महाराज, वाकचौरे, शिर्डी
३) ह. भ. प. श्री. एन. के. कुलकर्णी, पंढरपूर
४) ह. भ. प. निवृत्ती पाटील, गोंदकर
५) ह. भ. प. लक्ष्मण महाराज वाकचौरे, शिर्डी

**भजन, गायन, वादन वगैरे**— १) श्री. विठ्ठल विष्णू मांजरेकर, शिर्डी २) श्री. अशोक प्र. सोनारीकर, दहिसर अमळनेर ३) सौ. मीना शिवकुमार रेळे, मुं. ४) श्री. ए. व्ही. गुप्ता, (आं. प्र.) ५) श्रीमती विशालाक्षी सच्चाय ६) श्री. वसंतराव पवार, खरसुंडी ७) सुनीता शरदचंद्र वडवे, अहमदनगर ८) श्री. नंदकिशोर पुरोहीत, बडोदा ९) श्री. विठ्ठल रुक्मिणी प्रासादिक भजनी मंडळ, वरळे १०) श्री. व सौ. ज्योती ए. मनुजा, खार ११) श्री. मुरली मनुजा १२) मनीषा मनुजा १३) श्री. वासुदेव मोवर, मुं. १४) सौ. निर्मला बलराज नायडू, शिर्डी १५) कु. विजया वा. पाटील, मुं. १६) युनियन पार्क, वांद्रा १७) श्री. दत्तात्रय तुकाराम दयाळ, सातारा १८) श्री. प्रभाकर दिनकर पांचाळ, मुं. १९) श्री. चंद्रशेखर मनोहर देशपांडे हडपसर २०) श्री. चंद्रशेखर गाडगीळ व आर्केस्ट्रा पार्टी, पुणे २१) सौ. रश्मी चंद्रशेखर गाडगीळ २२) श्री. मुकेश देढीया २३) श्री. संजय भिडे २४) श्री. दत्तात्रय खेडकर २५) श्री. राजकुमार सबनानी २६) श्री. गोपाळ टाकूर २७) डॉ. विजयकुमार एम. पी. हैद्राबाद. २८) श्री. अनुरागकुमार श्रीवास्तव, बाईदली २९) रघुवीर चंदावरकर, बागलकोट ३०) श्री. अशोक काशीनाथ कानकाडे, भगूर.

**श्री दत्त जयंती**- सालाबाद प्रमाणे समाधिमंदिरात बुधवार दि. २९-१२-८२ रोजी दत्तजयंती कार्यक्रम झाला. दत्तजन्म कीर्तन सदाशिवबुवा पुराणिक, आळंदी यांनी केले. रात्री विद्युत रोषणाईने सुशोभित रथाची मिरवणूक गावातून फिरून आल्यावर शेजारती झाली.

**हवापाणी**—शिरडी येथील हवापाणी उत्तम असून रोगराई काही नाही. पहाटे हवेत गारवा असतो.


## श्रीसाईबाबांच्या आरत्यांची कॅसेट

शिरडीच्या श्रीसाईबाबांच्या मंदिरात काकड आरती, माध्यान्हआरती, धूपारती व शेजारती अशा म्हटल्या जाणाऱ्या आरत्यांच्या सुश्राव्य कॅसेटस नुकत्याच तयार झालेल्या आहेत. यातील आरत्या श्री. प्रभाकर कारेकर, अरविंद पिळगावकर, अजित काकडे, प्रकाश घांग्रेकर, शरद जांभेकर, सौ. रजनी जोशी, कान्होपात्रा किणीकर, सौ. सुधा जोशी व कु. रेगे यांच्या गळयातून उतरलेल्या आहेत. संगीत दिग्दर्शन श्री. वासुदेव चंद्रचूड यांनी केले असून या कॅसेटसची किंमत अवघी ४२ रु. आहे.

संपर्क – श्रीसाई निकेतन, ८०४ बी डॉ. आंबेडकर रोड, दादर, मुंबई १४


## साईभक्तास आमंत्रण

साईभक्तास कळविण्यात आनंद होत आहे की सालाबादप्रमाणे यंदाही 'साई सेवक मंडळ मुंबई' यांनी २१ एप्रिल १९८३ च्या रामनवमी उत्सवानिमित्त 'मुंबई ते शिर्डी' पदयात्रेने **पालखी सोहळा** आयोजित केला आहे. तरी ज्या साईभक्तांना या सोहळयात सामील होण्याची इच्छा असेल त्यांनी कृपया मार्च महिन्यातील 'साईलीला' अंकामध्ये सविस्तर माहिती वाचावी. ही विनंती,

कळावे.

आपला,

**साई सेवक मंडळ**, मुंबई

# साईबाबा संस्थान शिरडीची प्रकाशने

| अ. क्र. | पुस्तकाचे नाव | भाषा | किंमत रु. पैसे | पो. व पॅकिंग रु. पैसे |
|---|---|---|---|---|
| १) | श्री साईचरित्र | मराठी | १२=०० | ६=०० |
| २) | ,, | इंग्रजी | १३=५० | ४=०० |
| ३) | ,, | हिंदी | १२=०० | ४=०० |
| ४) | ,, | गुजराथी | १२=०० | ४=०० |
| ५) | ,, | कन्नड | १०=०० | ४=०० |
| ६) | ,, | तेलगू | १३=०० | ४=०० |
| ७) | ,, | तामीळ | १२=०० | ४=६० |
| ८) | श्री साईलीलामृत | मराठी | ७=५० | ३=०० |
| ९) | ,, | हिंदी | ७=०० | ३=५० |
| १०) | ,, | गुजराथी | ४=२५ | ३=०० |
| ११) | अवतार व कार्य | मराठी | ४=०० | ३=०० |
| १२) | स्तवन मंजरी | मराठी | ०=३५ | ३=०० |
| १३) | ,, | गुजराथी | ०=३० | ३=०० |
| १४) | सगुणोपासना | मराठी | ०=५० | ३=०० |
| १५) | ,, | गुजराथी | ०=५० | ३=०० |
| १६) | तेलगू पुजाविधी | तेलगू | छपाई चालू | आहे. |
| १७) | चार अध्याय | मराठी | १=२५ | ३=०० |
| १८) | श्रीसाईबाबा ऑफ शिरडी (भरुचा) | इंग्रजी | ५=०० | ३=०० |
| १९) | किर्तनमाला | मराठी | ०=७५ | ३=०० |
| २०) | सचित्र साईबाबा | मराठी | ४=०० | ३=०० |
| २१) | शिरडी दर्शन | इंग्रजी | ४=५० | ३=०० |
| २२) | मुलांचे साईबाबा | मराठी | १=७५ | ३=०० |
| २३) | ,, | इंग्रजी | १=७५ | ३=०० |
| २४) | ,, | तेलगू | छपाई चालू | आहे. |
| २५) | ,, | गुजराथी | १=५० | ३=०० |
| २६) | ,, | हिंदी | १=७५ | ३=०० |

**Regd. No. MH/BYE/26**
LICENCE No. 19
Licence To Post Without Prepayment
At Dadar Head Office, Bombay-14

( कव्हर पृष्ठ ३ वरून )

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १७) | ग्रेट सेंट श्री साईबाबा | मराठी | ०=५० | ३=०० |
| १८) | श्री साईबाबा दि सुपरमॅन | इंग्रजी | ५=२५ | ३=०० |
| १९) | शिरडी गाईड | इंग्रजी | १=५० | ३=०० |
| २०) | ,, | मराठी | १=५० | ३=०० |
| २१) | शिरडी गाईड | गुजराथी | १=५० | ३=०० |
| २२) | ,, | हिंदी | छपाई चालू | आहे. |
| २३) | रुद्राध्याय | मराठी | ०=९० | ३=०० |

२४) श्रीसाईलीला, अधिकृत मासिक मुखपत्र मराठी व इंग्रजी वार्षिक वर्गणी १०=०० प्रत्येकी प्रत १=००
( व्ही. पी. ची पद्धत नाही )

| अ.क्र | फोटोचे नाव | फोटो साइज | किंमत रु. पैसे | पो. व पॅकिंग रु. पैसे |
|---|---|---|---|---|
| १) | आशिर्वाद फोटो | १४"X२०' | १=६५ | ३=०० |
| २) | ,, | १०"X१४ | १=१० | ३=०० |
| ३) | ,, | ७"X१०' | ०=५५ | ३=०० |
| ४) | ,, | ४"X५" | ०=२० | ३=०० |
| ५) | ,, | २"X३" | ०=१५ | ३=०० |
| ६) | दगडावर बसलेले बाबा ( रंगीत ) | १४"X२०" | १=६५ | ३=०० |
| ७) | ,, ( काळा पांढरा) | १४"X२०" | १=६५ | ३=०० |
| ८) | मूर्ती फोटो | १३"X१८" | २=७५ | ३=०० |
| ९) | ,, | १३"X१८" | १=०० | ३=०० |
| १०) | द्वारकामाई कॅमेरा ( रंगीत फोटो ) | १०"X२० | १=१० | ३=०० |
| ११) | ,, ( काळा पांढरा) | १०'X१४" | ०=८५ | ३=०० |
| १२) | कॅमेरा द्वारकामाई फोटो ,, | ९'X१२' | १=१० | ३=०० |
| १३) | ,, ( रंगीत ) | ९"X१२' | १=६५ | ३=०० |
| १४) | निळा | ९X१३ | ०=७५ | ३=०० |
| १५) | श्रीसाईबाबांचे पत्र्याचे कॅलेंडर | — — — | १६=०० | ८=०० |

मुद्रक : पांडुरंग मोरे, बॉम्बे नॅशनल प्रिन्टर्स प्रा. लि., ४२, बी. डी. आंबेकर मार्ग, वडाळा, मुंबई ३१, संपादक व प्रकाशक : श्री. क. हि. काकरे, साई निकेतन, डॉ. आंबेडकर रोड, दादासाहेब फाळके पथ, प्लॉट नं. ८०४ बी, दादर, मुंबई १४